या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482


बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार ७ ऑगस्ट २०२४ | अंक२४१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# देवेंद्र फडणवीस हे मराठे मराठ्यांच्या अंगावर घालत आहेत, मनोज जरांगे पाटील यांचा मोठा आरोप

## तर तुमचे फार हाल होतील',

**देवेंद्र फडणवीस तुमचे आहेत तर मग जनता तुमची नाही का? मराठे तुमचे नाही का? मराठवाडा मिशन मग कशासाठी राबवतायत? शेती मालासाठी, पाण्यासाठी का मिशन राबवत नाही? मला बघून घेण्यासाठी मिशन राबवतायत का? मराठे कुणाच्याही सभा, प्रचारासाठी जाणार नाहीत. लोक यांना कंटाळून गेले आहेत. पण यांना वस्ताद भेटत नव्हता. मराठ्यांसाठी हा सुवर्णकाळ आहे. ही लाट सामान्यांची आहे. हा फरक सर्वसामान्य लोकांच्या लक्षात आला आहे. नेता मोठा करण्यासाठी यांचं मिशन सुरू आहे. पुन्हा सत्तेत येण्यासाठी यांचं मिशन सुरू आहे. आता हे लोक मोर्चे देखील काढणार आहेत, असं मनोज जरांगे आक्रमकपणे म्हणाले.आम्हाला राजकारणात ढकलू नका. जरांगे राजकारणात आला तर तुमचे फार हाल होतील. आम्हाला आरक्षण देऊन टाका. नाहीतर सत्तेत गेल्याशिवाय आम्हाला पर्याय नाही. नंतर मग आम्ही राजकारणात गेलो तर आम्हाला नाव ठेऊ नका. २९ तारखेला सगळं ठरेल. ही लाट गरिबांची आहे. सामान्य जनतेला वाटतं सर्व जातीधर्माला, राजकारण्यांना तुडवण्याची ही खरी वेळ आहे, असं मराठा नेते मनोज जरांगे पाटील म्हणाले.**

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. तसेच त्यांनी फडणवीसांवर गंभीर आरोपदेखील केला आहे. गॅझेट संदर्भात कुणाशीही काहीही चर्चा नाही. माझ्याविरोधात फडणवीस इतरांना बोलायला लावत आहेत. ते स्वतः बोलत नाहीत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठे मराठ्यांच्या अंगावर घालत आहेतअसा आरोप मनोज जरांगे यांनी केला. यावेळी मनोज जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावरही टीका केली. येवल्यावाला चूप बसलाय. जी बैठक मराठ्यांच्या आरक्षणाबाबत घेतली ती आरक्षणबाबत नव्हती, अस मनोज जरांगे म्हणाले. मनोज जरांगे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भूमिकेवरही प्रतिक्रिया दिली. आंदोलकांनी संयम ठेवावा. हे एक सरकारचं अंग आहे. हे आंदोलन करायला लावणं हा षडयंत्राचा भाग आहे. आपापला पक्ष वाचवण्यासाठी सगळे धडपड करत आहेत. पण विधानसभेनंतर सत्ताच बदलणार आहे, असा दावा मनोज जरांगे यांनी केला. देवेंद्र फडणवीस तुमचे आहेत तर मग जनता तुमची नाही का? मराठे तुमचे नाही का? मराठवाडा मिशन मग कशासाठी राबवतायत? शेती मालासाठी, पाण्यासाठी का मिशन राबवत नाही? मला बघून घेण्यासाठी मिशन राबवतायत का? मराठे कुणाच्याही सभा, प्रचारासाठी जाणार नाहीत. लोक यांना कंटाळून गेले आहेत. पण यांना वस्ताद भेटत नव्हता. मराठ्यांसाठी हा सुवर्णकाळ आहे. ही लाट सामान्यांची आहे. हा फरक सर्वसामान्य लोकांच्या लक्षात आला आहे. नेता मोठा करण्यासाठी यांचं मिशन सुरू आहे. पुन्हा सत्तेत येण्यासाठी यांचं मिशन सुरू आहे. आता हे लोक मोर्चे देखील काढणार आहेत, असं मनोज जरांगे आक्रमकपणे



म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांनी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्याबद्दल विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देणं टाळलं. मी प्रकाश आंबेडकर यांच्यावर उत्तर देत नाही. त्यांचा आम्ही आदर करतो. उद्यापासून सोलापूरमधून मराठा आरक्षण जनजागृती आणि शांतता रॅली सुरू होत आहे. मराठा समाजाला माझं आवाहन आहे की, एक दिवस काम बंद ठेऊन समाजासाठी द्या. सगळ्यांनी काम सोडून आपल्या जिल्ह्यातील रॅलीत सहभागी व्हा, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली.



## बेलखंडी येथे शेतकऱ्यांना मोफत नॅनो युरिया व डी ए पी फवारणी खताचे वाटप..!

**बीड प्रतिनिधी :-**

शेतकऱ्यांसाठी शासन स्तरावरून महाडीबिटी अंतर्गत फवारणी पंप, तुषार सिंचन, ठिबक सिंचन, विद्युत मोटार, कडबा कुटी मशीन, शेततळे, फळबाग नोंदणी, कृषी अवजारे, ट्रॅक्टर यासारख्या विविध योजना राबविल्या जात आहेत. शेतकऱ्यांनी अशा सर्व योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबिटी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केली पाहिजे. असे मत कृषी सहाय्यक व्ही एस बांगर यांनी केले. आज बेलखंडी पा. येथे कृषी विभागामार्फत देण्यात येणाऱ्या नॅनो युरिया व डी ए पी या फवारणी खताचे वाटप तालुका कृषी अधिकारी बि.आर. गंडे, मंडळ कृषी अधिकारी पी बी घुमरे, कृषी पर्यवेक्षक श्री मिटकरी एस बी. यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी सहाय्यक श्री व्ही एस बांगर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी शेती शाळा घेऊन शेतकऱ्यांना पीक जोपासना करणे बाबत मार्गदर्शन करून सर्व शेतकरी बांधवांनी ई पीक पाहणी जरूर करावी. नॅनो युरिया व फवारणी खताचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी शेतकर्यांनी कृषी कार्यालय येथे अर्ज करावेत असे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी कृषी सहाय्यक प्रकाश सावंत, माजी सरपंच नानाभाऊ भिंगले, माजी सैनिक बाबूराव पाहुणे, सुग्रीव डोके, प्रल्हाद बन, बिभीषण बडगे, विश्वनाथ सावंत, विलास भिंगले, सदाशिव वाळेकर, अशोक बडगे, गोरख भिंगले, भागवत सावंत, महेश बजगुडे, अविनाश बजगुडे, बबन सातपुते, बाबूराव माने, संपत मंडलीक, बबन कासारे, मथूरदास फाळके,गेनाजी कुर्लेकर, संघर्ष माने, कृषी मित्र अजय सावंत यांच्यासह गावातील पात्र लाभार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## आदर्श देवगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोधब निवड..

### अध्यक्षपदी गणेश गवळी व उपाध्यक्षपदी दिनकर सुरवसे यांची निवड

**वडवणी प्रतिनिधी ,अंकुश गवळी**

वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवगाव. केंद्र. काडीवडगाव ता.वडवणी जि.बीड या ठिकाणी शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली .यावेळी गावातील सर्व पालक बहुसंख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक श्री हाडुळे ए. एन यांनी शालेय शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठना संदर्भात उपस्थित सर्व पालकांना माहिती सांगितली. उपस्थित सर्व पालक सदस्यांनी अवघ्या काही वेळामध्ये शालेय व्यवस्थापन समिती सदस्य व अध्यक्ष यांची बिनविरोध निवड करून शाळेला



सहकार्य केले. आजच्या समिती निवडीमध्ये अध्यक्ष म्हणून श्री. गणेश राजेभाऊ गवळी तर उपाध्यक्ष म्हणून श्री. दिनकर राजेभाऊ सुरवसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. स्थानिक प्राधिकरण सदस्य म्हणून सौ. सोनाली ज्ञानेश्वर गवळी यांची निवड करण्यात आली तर शिक्षणप्रेमी नागरिक म्हणून श्री.भूषण बाबासाहेब सुरवसे यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे स्वागत शालेय समितीचे पूर्व अध्यक्ष श्री. गोरखनाथ रामप्रसाद सुरवसे व उपाध्यक्ष श्री. भीमा विष्णू गहिरे यांनी करून पुढील कामकाजासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या .अतिशय खेळीमेळीच्या च्या वातावरणामध्ये ही समिती पुनर्गठीत करण्यात आली खरोखरच नावाप्रमाणे आदर्श असलेल्या देवगाव ने या योगाने बिनविरोध शालेय समिती निवडून तालुक्यातील इतर गावांना एक आदर्श घालून दिला .उपस्थित नवनिर्वाचित सर्व सदस्यांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले, यावेळी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक श्री.हाडुळे ए.एन. श्रीमती गाढवे एम. जी.श्री.लांडगे एम जी,श्रीमती पवार एस बी. शेळके एन ए., व गावचे सरपंच मुकुंद सुरवसे, उपसरपंच महादेव सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य आधी शिक्षण प्रेमी गावातील युवक ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, व उपस्थित गावकरी पालकांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले .

## कळंबमध्ये भाजपच्या नेत्यांना जोडेमारो आंदोलन

**कळंब - प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांकडून सातत्याने मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांच्यावर होतं असलेल्या टिकेच्या पार्शवभूमी वर सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपचे माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे, खा. अनिल बोन्डे, आमदार प्रसाद लाड, प्रवीण दरेकर यांच्या प्रतिमेला वराहाची नावे देऊन सकल मराठा समाजाच्या वतीने जोडे मारो आंदोलन करण्यात आले, यापुढे ही भाजपचे नेते असेच व्यक्त होतं राहिले तर हे जोडे प्रतिमेला नाही तर प्रत्यक्षात त्यांना जाऊन मारू असा इशारा आंदोलकानी यावेळी दिला आहे. जरांगे पाटील यांनी आदेश दिला तर मराठा उमेदवार उभा करुन तो निवडून आणू, आणि लोकसभेप्रमाणे येणाऱ्या विधानसभेला ही मराठा आरक्षणा ला विरोध करणाऱ्या नेत्यांना मराठा समाज जागा दाखवल्याशिवाय शांत बसणार नाही असा इशारा ही यावेळी आंदोलकानी दिला आहे.

## आदर्श उपक्रमाचा साक्षीदार होतांना आनंद वाटला- युवा नेते शिवराज दादा पवार

### सामाजिक बांधिलकी जपणा-या युवकाला जपा -दत्तप्रसाद जाधव

**प्रतिनिधी (बीड) :**

दिवसेंदिवस वाढदिवस करण्याच्या पध्दती बदलतांना आपण पाहत आहोत. परंतू या सर्व गोष्टींना बाजूला ठेवून प्रा. आण्णा गांडगे यांनी मात्र स्वतः च्या वाढदिवसाच्या निमित्ताने जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप केले. असे उपक्रम नवीन युवकांनी राबविले पाहिजेत.अशा उपक्रमाचा साक्षीदार होतांना आनंद वाटेल असे प्रतिपादन गेवराई मतदारसंघाचे युवा



नेते शिवराज दादा पवार यांनी केले. पुढे भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव यांनी असे म्हटले की समाज उपयोगी उपक्रम राबवणाऱ्या युवकाला परिसरातील माणसांनी जपलं पाहिजे. त्याला काम करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे असे प्रतिपादन दत्तप्रसाद जाधव यांनी केले. शालेय साहित्य वाटप कार्यक्रम कुक्कडगाव , खुंड्स, आडगाव, रामगाव, लोणी, शाहजनपुर, नाथापुर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये राबवण्यात आले. तेथील विद्यार्थी व शिक्षकांना झालेला आनंद पाहुन प्रा. संदिप गांडगे असे म्हटले की दर वर्षी माझा वाढदिवस हा समाज उपयोगी उपक्रमाने साजरा होईल. या कार्यक्रमाला युवा नेते शिवराज दादा पवार, भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव,माजी जिल्हा परिषद सदस्य मनोज काका पाटील, सरपंच रितेश भैय्या साबळे ,सरपंच ज्ञानेश्वर शिंदे, सरपंच रमेश गाडे, सरपंच मनोज गुंड, उपसरपंच समीर बेग,ग्रामपंचायत सदस्य प्रमोद गोरे, ग्रामपंचायत सदस्य अंगद नाना देवडकर, विकास गव्हाने, राहुल मुंजाळ, प्रताप घुगे, समाजसेवक प्रवीणकुमार पालीमकर, रूग्णसेवक शरद झोडगे, कृष्णाजी पाटोळे, अजय जाधव, पत्रकार अंकुश गवळी, रितेश ढोकणे, श्रीकांत नवले, प्रत्येक शाळेतील शिक्षक वृंद व संदिप आण्णा गांडगे यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. शेवटी प्रा. संदिप आण्णा गांडगे यांनी सर्वांचे वाढदिवसाच्या निमित्ताने उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानले.

# यशवंत महाविद्यालय रसायनशास्त्र विभागाची यशस्वी परंपरा कायम

## सेट उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते सत्कार

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : येथील यशवंत महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग हा मराठवाडाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील एक नावाजलेला विभाग असून या विभागातील अनेक विद्यार्थी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या महाविद्यालयात प्राध्यापक,प्राचार्य आदी पदावर कार्यरत आहेत.तसेच येथील अनेक विद्यार्थी IIT,IICT NIT,IISER,NISER सारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेत आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवत आहेत. आजपर्यंत या विभागातून २५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सेट,नेट,गेट तसेच अनेक स्पर्धात्मक परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन केलेले आहे. तसेच या विभागात आत्तापर्यंत दीडशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च अशी ( पीएच.डी.) ही पदवी सुद्धा प्राप्त केलेली आहे.याही वर्षी रसायनशास्त्राची ही यशस्वी परंपरा कायम राहिली असून



यावर्षी यशवंत महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील ६ विद्यार्थी डॉ मदन आंभोरे, कु शाहमीन जुबैया श्री साईप्रसाद संत्रे, स्वानंद देशमुख,संकेत कोनेरी हे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक पात्रता चाचणी परीक्षा म्हणजेच सेट परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल श्री शारदा भवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेशचंद्र शिंदे,महाविद्यालयाचे प्रबंधक संदीप पाटील,रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ एम ए बसीर डॉ संभाजी वर्ताळे, डॉ सुभाष जुन्ने , डॉ विजय भोसले,डॉ शिवराज सिरसाट ,डॉ संदीप खांनसोळे, डॉ कविता केंद्रे, डॉ निलेश चव्हाण,डॉ दत्ता कवळे,प्रा संतोष राऊत,डॉ अनिल कुंवर,प्रा शांतुलाल मावसकर आदींनी अभिनंदन केलेले आहे.

# ३९ बीड लोकसभा मतदार संघात २१,५३,७७६ मतदार

## दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**बीड/प्रतिनिधी**

बीड, 5 : 39 बीड लोकसभा मतदार संघात 21,53,776 मतदार आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेत दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम 2024 अंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली. आज जिल्हाधिकारी कार्यालयात दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यासंदभात राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपजिल्हा निवडणुक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे तसेच प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. 01जुलै 2024 या अर्हता दिनाकांवर आधारीत दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांनुसार बीड जिल्ह्यातील 228 गेवराई, 229 माजलगाव, 230 बीड, 231 आष्टी, 232 केज व 233 परळी या सहा विधानसभा मतदार संघातील सर्व 2416 मतदान केंद्राचे ठिकाणी, सर्व मतदार नोंदणीचा पुनरीक्षण प्रारूप अंतर्गत मतदार यादी प्रसद्धि करण्यात आली. विधानसभा मतदार संघ निहाय मतदार केंद्र व मतदार संख्या 228 गेवराई विधानसभा मतदार संघात एकूण मतदान केंद्राची संख्या 404 असून यामध्ये पुरूष मतदार 1,93,762, महिला मतदार 1,72,216, इतर 9 इतके आहेत 229 माजलगाव विधानसभा मतदार संघात एकूण मतदान केंद्राची संख्या 393, पुरूष मतदार



1,80,668, महिला मतदार 1,59,989 इतर 1 230 बीड विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र 396, पुरुष मतदार 1,95,866 महिला मतदार 1,72,261, इतर 11 231 आष्टी विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र 440, पुरूष मतदार 2,00,388, महिला मतदार 1,75,027 इतर 1 232 केज विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र 420, पुरूष मतदार 1,97,559, महिला मतदार 1,78,174, इतर 3 233 परळी विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र 363 पुरूष मतदार 1,71,815 महिला मतदार 1,56,023 इतर 3 असे एकूण 2416 मतदान केंद्र असून एकूण पुरूष मतदार 11,40, 058 महिला मतदार 10,13,690 इतर 28 असे एकूण 21,53,776 मतदार संख्या 39 बीड लोकसभा मतदार संघात आहे. आज ही प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली.

## श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरा तर्फे 112 गरजुंना आर्थिक मदत वाटप

हिंगोली :- (प्रतिनिधी) शहरातील गड्डीपीर भागातील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरा तर्फे ११२ गरजु व्यक्तींना ३ ऑगस्ट रोजी प्रत्येकी ५ हजार रुपयांची आर्थिक मदत वाटप करण्यात आली. सहाय्यक धर्मादाय आयुक्त रविंद्र धायतडक यांच्या संकल्पनेतुन मागील दोन वर्षापासुन गरजु व्यक्तींना श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरा तर्फे आर्थिक मदत वाटप केली जाते. त्यानुसार यावर्षीही ३ ऑगस्टला वयोवृध्द, अपंग, निराधार, विधवा महिला, शैक्षणिक व वैद्यकिय उपचाराकरीता ११२ व्यक्तींना प्रत्येकी ५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश सहाय्यक धर्मदाय आयुक्त रविंद्र धायतडक यांच्या हस्ते वितरीत करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थानचे अध्यक्ष रमाकांत मिस्कीन, सचिव दिलीप बांगर, उपाध्यक्ष सुरेश घन, सदस्य सतिश लोहिया, मनोज दावनगिरे, किशोर मिस्कीन, सल्लागार डॉ. प्रा. विलास डोईफोडे आदींची उपस्थिती होती. सुत्रसंचलन दिलीप बांगर यांनी केले. विशेष म्हणजे मागील दोन वर्षापासुन गरजु व्यक्तींना श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरा तर्फे ही आर्थिक मदत दिली होती.

## जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्याकडून ३४ उमेदवारांना तलाठी पदावर नियुक्ती

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड-किनवट : तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा देशोन्नतीचे शहर प्रतिनिधी प्रमोद अण्णासाहेब पोहरकर यांना महात्मा कबीर समता परिषदेचा महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड झाली आहे हा पुरस्कार १४- ऑगस्ट रोजी नांदेड येथे एका विशेष कार्यक्रमात देण्यात येणार आहे अशा आशयाचे पत्र कबीर, समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर मुकुंदराज पाटील यांनी दिले आहे. राजकीय सामाजिक शैक्षणिक पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना महात्मा कबीर समता परिषदेच्या वतीने दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येऊन त्यांचा सन्मान ही एका विशेष कार्यक्रमात केला जातो लवकरच पुरस्कार वितरण सोहळा नांदेड येथे आयोजित करण्यात येणार आहे या कार्यक्रमात किनवट तालुका पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष तथा देशोन्नतीचे प्रमोद पोहरकर यांना महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव व पुरस्कार व मानपत्र देऊन



सन्मान केला जाणार आहे पत्रकारीते सोबतच त्यांनी सामाजिक कार्याचा वसा हाती घेतलेला आहे ते भारतीय सैन्य दलात त्यांनी नोकरी करित देश सेवा ही केली विविध सामाजिक कार्यात ही पोहरकर सदैव अग्रेसर असतात एकूण त्यांच्या कार्याची दखल घेऊन महात्मा कबीर समता परिषदेने त्यांना महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाणार आहे त्यांच्या या निवडीवर विविध क्षेत्रातील मान्यवर आणि किनवट माहूर तालुक्यातील पत्रकार बांधवांनी प्रमोद पोहरकर यांचे अभिनंदन केले आहे.

# कीटक नियंत्रणासाठी ग्लू बोर्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन स्थापन

**संतोष पडवळ - प्रतिनिधी**

ठाणे, ६ ऑगस्ट ६ : आघाडीच्या ग्लू बोर्ड उत्पादकांनी एकत्र येऊन ग्लू बोर्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (GBMA) स्थापन केली आहे, जी उद्योगाच्या उन्नतीसाठी समर्पित असलेली सर्वोच्च संस्था आहे. ही एक नवीन युती आहे जी कीटक नियंत्रण व्यवस्थापन विशेषतः उंदीर नियंत्रणाच्या संदर्भात वाढविण्यासाठी वचनबद्ध आहे. GBMA अग्रगण्य ग्लू बोर्ड उत्पादकांना एकत्र आणून उद्योगांना उंदीरांच्या प्रादुर्भावाच्या प्रतिकूल परिणामांपासून संरक्षण करणे या सामायिक दृष्टीकोनातून तयार केली आहे. GBMA कीटक नियंत्रणासाठी, विशेषत: उंदीर व्यवस्थापनासाठी आवश्यक साधन म्हणून गोंद सापळ्यांचा सतत वापर आणि निर्मिती करण्याचा सल्ला देत आहे. GBMAचे उद्दिष्ट अलीकडील नियामक आव्हानांना तोंड देण्याचे आहे, ज्यामुळे ग्लू बोर्डची उपलब्धता आणि परिणामकारकता प्रभावित होईल. इंडियन ग्रेन स्टोरेज मॅनेजमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, IG-MRI च्या मते सामान्यतः उंदीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उंदीरांना १९७५ पासून "राष्ट्रीय कीटक" म्हणून ओळखले जाते, ज्यामुळे ते



मानवतेसाठी एक मोठा धोका बनतात. उंदीर केवळ धान्यच खातात असे नाही तर त्यांच्या कचऱ्याने, केसांनी आणि कधीकधी त्यांच्या शरीराच्या २० पटीने धान्य दूषित करतात. GBMA २०११ आणि २०२० ची परिपत्रके उलथून टाकण्यासाठी सक्रियपणे प्रयत्न करत आहे ज्यात ग्लू ट्रॅप्सच्या निर्मिती आणि वापरावर बंदी घालण्याची शिफारस केली होती. या परिपत्रकांमुळे कीटक नियंत्रण उद्योगात महत्त्वपूर्ण अडथळे आले आहेत, ज्यामुळे उंदीर लोकसंख्येचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्याच्या प्रयत्नांना अडथळा निर्माण झाला आहे. या नियमांना आव्हान देण्याव्यतिरिक्त, GBMA ग्लू ट्रॅप्सच्या निर्मिती, वापर आणि आयातीवर बंदी घालण्याशी संबंधित कोणत्याही कारवाईवर तात्काळ स्थगितीची मागणी करत आहे. ग्लू बोर्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (GBMA) चे सचिव आणि अर्बुदा ॲग्रोकेमिकल्सचे व्यवस्थापकीय संचालक मुकेश पटेल म्हणाले, "ग्लू बोर्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची स्थापना हा कीटक नियंत्रण उद्योगासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि जनतेचे संरक्षण करण्याच्या आमच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचे पाऊल आहे. आरोग्य आणि सुरक्षितता ग्लू बोर्ड हे एकात्मिक कीटक व्यवस्थापन धोरणांचे एक महत्त्वाचे घटक असून जे उंदीरांच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक प्रभावी, गैर-विषारी उपाय देतात."

# कल्याण येथे श्री सावता महाराज संजिवनी समाधी सोहळा भक्तीभावात साजरा

**कल्याण/प्रतिनिधी**

: श्री सावता माळी मंडळ कल्याण याच्या वतीने विश्वसंत सद्गुरु वामनराव पै सभागृह कल्याण (प)येथे लक्ष्मी व अमित जामकर यांच्या हस्ते श्री सावता महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रंथ वाचन करुन भक्तीभावात कार्यक्रमास सुरवात करण्यात आली . प्रवचन व रामकृष्ण हरी महिला भजन मंडळ कल्याण कोळसेवाडी यांनी अनेक अभंगातून बहारदार भजने सादर केली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिलशेठ थोरात यांनी सांगितले कि, हा कार्यक्रम आपल्या घरचा आहे. हे आपले दैवत आहे यासाठी तन मन धनाने सर्वांनी




सहकार्य करून समाज संघटीत करून सुख दु : खात सहभागी झाले पाहिजे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते गुणवंत कामगार पुरस्कार सन्मानित सुदाम गाडेकर यांनी या प्रसंगी म्हणाले की आज श्री सावता महाराज यांचा ७२९ वा समाधी सोहळा साजरा करित असताना या महाराष्ट्रात अनेक संत जन्माला येवून भक्तीचा मार्ग दाखवून जीवन कसे जगावे याचे महत्व आपल्या अभंगातून सागितले आहे . ते आपण अंगिकारले पाहिजे या निमित्ताने जेष्ठ सभासद महादेव जगताप , मनोहर बटवाल, सेवा निवृत समाज बंधू वसंत आनप, सुरेखा नाईक, उज्वला डोके यांचा संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार व सन्मानित करण्यात आले. सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव करून शैक्षणीक भेट वस्तू देण्यांत आल्या. दहावी बारावी पदवीधर यशस्वी विदयार्थ्यांना रोख रक्कम व भेट वस्तू देवून शुभेच्छा देण्यांत आल्या.कादंबरी गडगे, ताम्हाणे , थोरात यांनी या मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. विक्रम बटवाल, रविन्द्र चौधरी,संपत जायकर, भूषण मेहेर,नवनीत गायकवाड, हेमंत आनप, अरूण चौधरी,अनिल कळमकर, दिपक राऊत, संदिप परंडवाल,विठ्ठल घोडेकर, प्रभावती डोंगरे, अनुराधा भुजबळ , मंदा ताम्हाणे बटवालताई या सर्व कार्यकत्यांनी विशेष परिश्रम घेवून उत्साह पूर्ण वातावणात सावता महाराज यांचा जय घोष करित पसायदाने व महाप्रसादाने कार्यक्रम संपन्न झाला

************************

## दिवा चौकात छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारणार.



**संतोष पडवळ - प्रतिनिधी ठाणे, दिवा ता ६ ऑगस्ट : ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा शहरातील एकमेव अश्या गजबजलेल्या चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. ठाणे महापालिका प्रशासनाने यासंदर्भात प्रस्ताव तयार केला असून शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतरच या चौकात पुतळा उभारण्यात येणार असल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.**

**ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा हे महत्वाचे जंक्शन आहे. या जंक्शन वरून दिवस भरात लाखों प्रवाशी ये- जा करतात गेल्या काही वर्षात दिवा शहराच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. दरम्यान या भागात महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा एकही भव्य पुतळा नाही. दिवा स्टेशन रोड, आगसन रोड व दिवा स्टेशनला जोडणारा शिळ दिवा रोड या तीन मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या दिवा चौक येथे आवश्यक चौथरा बांधून छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा उभारण्याचा मानस प्रशासनाचा आहे. लवकरच शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर पुतळा उभारण्यात येणार आहे असे ठाणे महापालिकेकडून कळविण्यात आले आहे.**

# वंचीतानां वंचीत करण्याचा रंगा, बिल्ला चा डाव उधळून लावणार– नगरसेवक बिबिशन लांडगे

**बीड प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक 3 मधील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी इतरत्र वळविण्याचा डाव बीड शहरातील दोन जण रंगा बिल्ला चा डाव उधळून लावणार असल्याचे नगरसेवक बिबीशन लांडगे यांनी पत्रकातून सांगितले आहे. पिढ्या न पिढ्या सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात सदा सर्वदा उपेक्षित राहिलेल्या वंचीत घटकांना बहुजनांचे उध्दारकर्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधनात्मक तरतूद करत न्याय दिला शिव, फुले, शाहू, आंबेडकर,साठे या महामानवांच्या विचारांचा वारसा प्रत्येकाने जोपासत अन्यायाच्या विरोधात बंड करून उठलं पाहिजे, हाच आमचा उद्देश असून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी पळवण्याचे मनसुबे कधीही साध्य होऊ देणार नाही

अनु.जाती,साठी राखीव प्रभागात विकास कामे करण्यासाठी लोक संख्या नुसार शासनाकडून निधी दिला जातो परंतु विकास कामात सतत खोडा घालणारे सिनेमातील रंगा, बिल्ला यां खलनायकांना ही लाजवणारे बीड चे वास्तवातील रंगा, बिल्ला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी स्वतः च्या बाबजाद्यांची जहागिरी असल्यागत टक्केवारी (दलाली) खाण्यासाठी आमच्या राखीव प्रभागातील निधी इतरत्र वळविण्यात यावा म्हणून पत्र देतात ही मोठी दुर्दैवाची बाब असून वंचीतानां अधिक वंचीत करण्याचा रंगा, बिल्ला चा हा डाव आपण उधळून लावणार असल्याचे नगरसेवक बिबिशन लांडगे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून सांगितले आहे आमच्या प्रभागातील विकास कामे करणे गरजेचे आहे आमच्या प्रभाग 3 मधील नागरिकांच्या मागणी नुसार आपण सी.सी रस्ते व नाल्याची कामे सुचवली आहेत लवकरच सदरील विकास कामांना शासन स्तरावरून निधी प्राप्त होईल ज्यांना कोणाला इतर प्रभागात विकास कामे करावयाची आहेत त्यांनी बिल्कुल करावी परंतु तो निधी स्वतः आणावा



त्यांचे आम्ही स्वागत करू परंतु आमच्या हक्काचा एक छदाम निधी देखील निधी पळवणाऱ्या दोन टोळक्यानां देऊ देणार नाही लवकरच याबाबत आपण मा जिल्हाधिकारी तसेच आमचे नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांची भेट घेऊन निवेदन देणार असून समाज बांधवांच्या हितासाठी वेळप्रसंगी लोकशाही मार्गाने आंदोलन देखील करणार असल्याचे नगरसेवक बिबिशन लांडगे यांनी दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे

# नाथसागर जलविद्युत प्रकल्पातील हायड्रो केंद्रातील मशिनरी निकामी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना बंद जलविद्युत केंद्राबाबत तक्रार

**छत्रपती संभाजीनगर**

पैठणच्या जायकवाडी प्रकल्पावर तत्कालीन मुख्यमंत्री शंकराव चव्हाण व पाटबंधारे खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांनी अभ्यास करून सर्वांच्या फायदेशीर ठरणाऱ्या जलविद्युत केंद्र ( हायड्रो) देशातील एक उत्कृष्ट ठरणारे जपान सरकारने तयार केलेले जपानी जलविद्युत केंद्र सुरू कले.अतिशय चांगल्या पद्धतीने हे बारा मेगाव्होट हायड्रो केंद्र चाललेही. त्यापासून तयार झालेल्या वीज निर्मितीचा फायदा महाराष्ट्रातील जनतेचा झाला.त्यातून महाराष्ट्र शासनाला कोट्यावधी रुपयांचे उत्पन्नही मिळाले, पण गेल्या काही वर्षापूर्वी स्थानिक पाटबंधारे खात्याने नाथसागरातून गोदावरी पात्रात पाणी सोडताना जलविद्युत केंद्रात पाणी शिरणार नाही असे नियोजन न करताच पाणी सोडले ते पाणी हायड्रो केंद्रात घुसले



आणि हायड्रो केंद्रातील मशिनरी निकामी झाल्याची अधिकृत असल्याचे समजते. शासनाने जलविद्युत केंद्र कायमस्वरूपी चालू राहावे हाच उद्दिष्ट ठेवून हे युनिट चालू केले,ते बंद होण्यासाठी नाही. याचा विसर मात्र संबंधित अधिकाऱ्यांना पडल्याचे दिसून येते. यावरून हे विद्युत केंद्र सुरू होऊ शकत नाही असे त्यांच्या वर्तनाचा अनुभव येत असल्याचे दिसून येत आहेत.याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेऊन हायड्रो सुरू करण्यासंदर्भात अडीअडचणी सोडवण्यासाठी केंद्र सुरू करण्यासाठी बैठक घेण्याची काळाची गरज आहे. नसता एक चांगल्या हायड्रो युनिट बंद होण्याच्या मार्गाकडे वाटचाली समोर येत आहे. जपानी असलेले हे युनिट महाराष्ट्र शासनाचा एकमेव चांगल्या प्रकारचा विद्युत निर्मिती करणारा प्रकल्प आहे. त्यावेळच्या सरकारमधील मंत्र्यांनी, अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रयत्नांनी हा प्रकल्प यशस्वी रित्या चालवला आहे.पण सध्यास्थितीत संबंधित अधिकाऱ्यांच्या वर्तनामुळे हायड्रोचे तीन तेरा वाजले आहेत. शासनाने जपानमधील हे युनिट सुरू करण्यासंदर्भातील तज्ञांना बोलावून भारताने तांत्रिक कामगिरीत मजल मारली आहे .त्याही तांत्रिक तज्ञांची तथा अभ्यासकांची मदत महाराष्ट्रातील एक दुर्मिळ असलेला हा प्रकल्प सुरू करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करण्याची गरज आहे.या जलविद्युत केंद्रातून पात्रात पाणी सोडून व तेच पाणी परत नाथसागरात घेऊन वीजनिर्मिती करणारे केंद्र आहे. हे केंद्र सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अति तात्काळ हालचाली कराव्यात अशी जनतेची मागणी आहे. महाराष्ट्र शासनाचा उद्देश हे जल केंद्र सातत्याने पूर्णवेळ कार्यरत राहील हा उद्देश ठेवूनच हे जलविद्युत केंद्र उभे करण्यात आले. परंतु हे जलविद्युत केंद्र सुरू करण्यासाठी वीज निर्मिती व वीज वितरण प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून हे विद्युत केंद्र पूर्णतः पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले नाहीत.त्यामुळे या विद्युत केंद्रापासून शासनाला जो आर्थिक फायदा होत होता व होणार आहे त्यासाठी स्थानिक जलसंपदा विभाग व जल वितरण हायड्रो विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसह वरिष्ठांनी ही वेळीच लक्ष न घातल्यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपयांची नुकसान होत आहे.

# ब्लास्टिंगच्या तीव्रतेने घराला तडे, वापरण्यात येणाऱ्या केमिकलच्या वासाने ग्रामस्थ आजारी, ग्रामस्थ आक्रमक

पनवेल / प्रतिनीधी नवी मुंबई विमानतळाचे काम करताना ब्लास्टिंगची तीव्रता जास्त आहे. याचा परिणाम येथील ग्रामस्थांच्या घरांवर होत आहे. त्यामुळे या ब्लँस्टिंग विरोधात ओवळे, कुंडेवहाळ ग्रामस्थ आक्रमक झाले असून 6 ऑगस्ट रोजी त्यांनी येथील ब्लास्टिंगचे काम बंद पाडून सिडकोला जाब विचारला. यावेळी 27 गाव प्रकल्पबाधित संघटनेचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, ओवळे सरपंच रुपेश गायकवाड, उपसरपंच निलेश गायकवाड, कुंडेवहाळ सरपंच सदाशिव वासकर, विक्रांत घरत यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम ओवळेगावा जवळ सुरू आहे. या कामासाठी या भागात असलेले डोंगर फोडण्यासाठी ब्लास्टिंगचा वापर करण्यात



येत आहे. हे डोंगर फोडताना ज्या तीव्रतेने ब्लास्टिंग करणे आवश्यक असते. त्याहून जास्त तीव्रतेने हे ब्लास्टिंग करण्यात येत आहे असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच ब्लास्टिंग करताना केमिकल आणि ब्लास्टिंग झाल्यानंतर जो वास येतो त्यामुळे नागरिक आजारी पडत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार 150 होल पाडून ब्लास्टिंगचे नियोजन सिडकोने केले होते याची माहिती ओवळे आणि कुंडेवहाळ ग्रामस्थांना समजली. यापूर्वीच ब्लास्टिंगमुळे गावातील काही घरांना तडे गेल्याच्या घटना घडल्या आहेत. परंतू तरीही येथे अधिक तीव्रतेने ब्लास्टिंग होणार असल्याचे ओवळे, कुंडेवहाळ गावातील ग्रामस्थांना समजले. त्यानुसार त्यांनी या विरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. यावेळी होत असलेल्या ब्लास्टिंग विरोधात घोषणाबाजी केली. यावेळी सिडको अधिकारी यांनी या ठिकाणी येऊन ग्रामस्थांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला परंतु ग्रामस्थ अधिकच आक्रमक झाले. हे ब्लास्टिंग बंद करण्याची मागणी केली. ब्लास्टिंगमुळे दगड घरावर उडाल्यास होणाऱ्या जीवित हानीस कोण जबाबदार राहणार असा सवाल यावेळी विचारण्यात आला. त्यामुळे येथील ब्लास्टिंगचे काम तात्पुरते बंद ठेवण्यात आले होते. यावेळी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता.

## सेवानिवृत्तीनिमित्त डॉ.फुलचंद सलामपुरे यांचा सोयगाव ला गौरव

**छत्रपती संभाजीनगर**

माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.फुलचंद भगीरथ सलामपुरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात बुधवारी गौरव सोहळा आयोजित करण्यात आला.

डॉ सलामपुरे हे ३० वर्षांच्या सेवेनंतर ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. यानिमित्ताने प्राचार्य डॉ शिरीष पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवरी हा कार्यक्रम झाला. यावेळी डॉ सलामपुरे व वसंतीबाई सलामपुरे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यापीठाच्या विद्यार्थी संसदेचे माजी अध्यक्ष, अधिसभा, व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. तसेच १९८६ मध्ये अखिल भारतीय विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक पटकाविले होते. गेली ३० वर्षे त्यांनी पंडित नेहरु महाविद्यालय व संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात अध्यापन कार्य केले. यावेळी प्राचार्य शिरीष पवार, उपप्राचार्य रावसाहेब बारोटे, डॉ दिलीप बिरुटे ,प्रा.शिरीकृष्ण परिहार, प्रा.शत्रूघन भोरे, प्रा.उल्हास पाटील,कार्यालयीन अधीक्षक साबळे, लक्ष्मण साळोक, प्राचार्य मधुकर चाटसे, डॉ कांबळे दयानंद,प्रा,संजय बिरंगणे,अमृत बिराडे, ऍड.सारंग देशमुख यांच्यासह संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सोयगाव पोलीस ठाण्याची इमारत उदघाटना अभावी धूळखात पडून

### उद्घाटनासाठी मुहूर्त मिळेना

**छत्रपती संभाजीनगर**

पाच कोटी नऊ लक्ष रु खर्चून उभारण्यात आलेल्या सोयगाव पोलीस ठाण्याचे इमारत उदघाटनचा मुहूर्त मिळत नसल्याने धूळखात पडून आहे लोकसभा निवडणुकीच्या आचार संहितेत या पोलीस ठाण्याच्या इमारती चे उदघाटन अडकले होते मात्र त्यानंतर अद्यापही मुहूर्त मिळाला नसल्याने ही वास्तू उभीच आहे



शासनाने सोयगावला तालुका पोलीस ठाणे व्हावे यासाठी पाच कोटी नऊ लक्ष रु मंजूर केले होते या इमारतीचे भूमिपूजन ही झाले त्यानंतर इमारत उभी राहून चार महिने झाले तरीही अद्याप या इमारतीच्या उदघाटन चा मुहूर्त मिळाला नाही त्यामुळे सोयगाव पोलीस ठाण्याची नवीन इमारत कुलूपबंद स्थितीत आहे. सोयगाव पोलीस ठाण्यासाठी शहरातील बाजार पट्टा भागात भाड्याच्या खोलीत गेल्या चाळीस वर्षा पासून सोयगाव पोलीस ठाण्याचे कामकाज सुरू आहे इमारत ऊभी राहुनही चार महिन्यापासून सोयगाव पोलीस ठाणे अद्यापही भाड्याच्या खोलीत सुरु आहे त्यामुळे नवीन वास्तु धूळखात पडून आहे शहरवासीयांमध्ये या नवीन इमारती च्या उदघाटन ची प्रतीक्षा लागून आहे. सोयगाव पोलीस ठाण्याचे इमारती सह पोलीस निवासस्थानाचा प्रस्तावही मंजुरी साठी पाठविण्यात आला होता मात्र मंजूरी अभावी निवास स्थानचा प्रस्ताव शासन दरबारी धूळखात पडून आहे.

## अखेर दासखेड,कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू

**छत्रपती संभाजीनगर**

बीड:- पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारतीसाठी २ कोटी ६३ लाख आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थाना साठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्चून सर्व सोयींनी युक्त आरोग्य केंद्र बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून बांधकाम पूर्ण झालेले असतानाही शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. मात्र पंचक्रोशीतील गोरगरीब, कष्टकरी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांची हेळसांड होत असुन त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावीत यासाठी दि.१५ ऑगस्ट आगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.सरिता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/ उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी घेत जिल्हा आरोग्य आधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना दिले होते. त्या अनुषंगाने डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासुन दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला असुन रूग्णांची गैरसोय दूर झाली असुन पाटोदा येथे उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाल्याने रूग्णांची हेळसांड थांबणार ; पिण्याचे पाणी आणि विजेची सोय करावी :- प्रविण शिंदे (दासखेड )

दासखेड येथील भुमिपुत्र कृष्णा जाधव हे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू अधिकारी असुन एकनाथ शिंदे आरोग्यमंत्री असताना कृष्णा जाधव ओ.एस.डी. म्हणून काम पहात होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे दासखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात येऊन २ कोटी ६३ लाख खर्चून ईमारत बांधण्यात आली मात्र २ वर्षांपासून आरोग्य सुविधा सुरू नव्हती.आता आरोग्य सुविधा सुरू झाल्याने पंचक्रोशीतील रूग्णांची हेळसांड थांबणार आहे. याठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि विजेची सोय नाही तेवढ्या त्रुटी आरोग्य विभागाने दुर कराव्यात. अखेर दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा सुरू दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तब्बल २ कोटी ६३ लाग रूपये खर्चून मुख्य ईमारत सर्व सोयींनी युक्त बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते.संबधित प्रकरणी १५ ऑगस्ट रोजी आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर डॉ.सारिका हजारे सहसंचालक आरोग्यसेवा ( प्राआकें/ उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी निवेदनाची दखल घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या सुचना दिल्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण सेवा सुरू करण्यात आली असुन वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे कार्यरत असुन रूग्णांना आरोग्य सेवा देत आहेत.

आवश्यक पदभरती झाली असुन बाह्यरुग्ण विभाग सुरू :- डॉ.उल्हास गंडाळ ; जिल्हा आरोग्य अधिकारी बीड

दासखेड आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत. क्लार्क ,एएनएम, सफाई कामगार अशा स्वरूपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडुन भरण्यात आलेला असुन दि.१ ऑगस्ट पासुन दोन्ही केंद्रातील बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आलेला असुन पुढील सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील.

# राजकारणातला आदर्श युवानेता संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होतोय २३ ऑगस्टला

**विशेष | प्रतिनिधी**

सध्याचं राजकारण, समाजकारण, नागरिकांची होणारी फरफट आणि त्यातून पेटून उठणारा एक 'युवानेता'. सोशल मीडियावर नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'युवानेता' चित्रपटाच्या पोस्टरने संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घातला आहे. लक्षवेधी शीर्षकामुळे तरुणांमध्ये चित्रपटाबद्दल कमालीची उत्सुकता दिसत आहे. चित्रपट २३ ऑगस्ट २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

महाविद्यालयातील अंकुर मित्रांसमवेत अन्यायाविरुद्ध नेहमी लढा देतो. अंकुरची वाढलेली लोकप्रियता स्थानिक आमदारास खुपू लागते. आमदार आपली शक्ती वापरुन अंकुरला दाबण्याचा प्रयत्न करतो. मात्र अंकुर न दबता तेवढ्याच त्वेषाने उभारी घेतो. या सर्व गदारोळात मित्र, प्रेम आणि नाती हरवतात का? आणि त्यांची किंमत मोजावी लागते का? हे चित्रपटात प्रकर्षाने कळणार आहे.




मनाला प्रश्नांच्या घेऱ्यात अडकवणारं कथानक, गंभीर आणि खोल संवाद, दर्जेदार कलाकारांची जुगलबंदी, मंत्रमुग्ध करणारी गाणी आणि अंगावर शहारे आणणारं पार्श्वसंगीत या समीकरणामुळे 'युवानेता' चित्रपटाची चर्चा महाराष्ट्रात सर्वत्र होणार आहे. प्रकाश फिल्म्स प्रस्तुत युवानेता चित्रपट योगेश रमेश जाधव यांनी दिग्दर्शित केला आहे. योगेश जाधव यांची ही सहावी राजकीय सामाजिक चित्रकृती आहे. राजू राठोड, जगदीश कुमावत यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. कथा अंकुर क्षीरसागर, पटकथा अमित बेंद्रे, संवाद भक्ती जाधव, अंकुर क्षीरसागर, अमित बेंद्रे, छायाचित्रण मयूरेश जोशी, कार्यकारी निर्माता कुणाल निंबाळकर, निर्मिती व्यवस्थापन रवी दीक्षित, प्रसाद कुलकर्णी, कला दिग्दर्शन नितीन बोरकर, दिलीप कंढारे, संकलन विशाल कोटकर, संगीत अमोल नाईक, नीलेश पाटील, गीत राजेश सांगळे, नितीन बागडे, नीलेश पाटील, रंगभूषा सुशांत वाघमारे, वेशभूषा स्मिता धुमाळ, साऊंड रेकॉर्डीस्ट योगेश क्षीरसागर, नृत्यदिग्दर्शन रोहन केंद्रा, मानसी कोवळे, यांनी केले आहे. "सद्यस्थितीत दूषित झालेलं राजकारण आणि प्रस्थापित नेत्यांच्या स्वार्थी प्रतिमेपलीकडे जाऊन एक आदर्श नेता कसा असावा, या विचाराने 'युवानेता' चित्रपटाची निर्मिती झाली आहे. तळागाळातून आलेला आणि समाजभान असलेला अंकुर प्रस्थापितांच्या छाताडावर बसून संघर्षातून सूर्य कसा निर्माण करतो, हे चित्रपटात पहायला मिळणार आहे. आशा आहे की महाराष्ट्रातील रसिक प्रेक्षकांना चित्रपट नक्कीच आवडेल." असे चित्रपटाचे दिग्दर्शक योगेश रमेश जाधव म्हणाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

बुधवार ७ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# भुजबळ हा चोट्ट्यांचा नॅशनल अध्यक्ष, मनोज जरांगे पाटील यांची छगन भुजबळ वर सडकून टीका

## ‘मग SEBC का लागू केलं? कायदा तुम्हीच बनवला’

**“EWS मुळे मराठ्यांचं नुकसान झालं असं एक नेता बोलला. मग SEBC का लागू केलं? कायदा तुम्हीच बनवला. तुम्हाला लाज वाटली पाहिजे, जसं काही माझ्यामुळे EWS गेलं आहे. नुकसान करायला जबाबदार तुम्ही आहात. त्यामुळे EWS, SEBC, कुणबी हे तीनही पर्याय खुले ठेवा. जात प्रमाणपत्र राबवण्यासाठी 6 महिन्यांची मुदत द्या. तुम्ही मिशन सुरू केलं की आम्हीही मिशन सुरू करू. तुमचं मराठवड्यात मिशन सुरू झालं की विदर्भ, कोकणात सगळीकडे आम्ही आभियान सुरू करु”, असं मनोज जरांगे म्हणाले.**





मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी जालन्यात आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यावर सडकून टीका केली. “जिथे जिथे मराठ्यांना त्रास दिला तिथे त्यांचा हिशेब होणार. 100 टक्के हिशोब होणार. मराठा असो की ओबीसी कुणालाही सुट्टी नाही. भाजपच्या मिशनच्या नादात त्यांचे सगळे अड्डे उद्धवस्त होणार. भाजप आमदाराचं मिशन फडणवीस यांना वाचवण्यासाठी सुरू आहे ते मिशन सत्तेत येण्यासाठी आहे तर मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी नाही. यावेळी हिशोब होणार, वंचितांच्या गरिबांच्या बाजूने यावेळी यश येण्याची शक्यता आहे”, असं मनोज जरांगे म्हणाले. “पक्ष आणि नेत्यांची भावना समजून घेण्यापेक्षा जनतेची भावना समजून घ्या. ज्यांना हे लोक उमेदवारी देणार नाहीत तेही माझ्याकडे येणार. जे आमच्याकडे येतील त्यांना संधी द्यावी तरी कशी? आमच्याकडेच 150 तयार आहेत. रोज आजी-माजी आमदार भेटायला येतात. माजी जास्त येत आहेत. मराठे सगळ्यांना सोबत घेऊन एका मार्गाने चालणार. देवेंद्र फडणवीस यांनी सगळे चोरटे एकत्र केले. भुजबळ हा चोट्ट्यांचा नॅशनल अध्यक्ष आहे”, अशी खोचक टीका मनोज जरांगे यांनी केली.

## दिवा शिवसेना आयोजित गणेशभक्तांना कोकणात जाण्यासाठी मोफत बस.

**ठाणे प्रतिनिधी**

ठाणे, दिवा ता ६ ऑगस्ट : दिवा शहरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतुन कोकण चाकरमान्यांसाठी गणेशोत्सवात गावी जाण्यासाठी बसेस उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत त्या नुसार माणगाव, महाड, पोलादपुर, खेड, मंडणगड, दापोली, गुहागर, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा, राजापुर, खारेपाटण, तळेरे, वैभववाडी, कणकवली, कुडाळ, मालवण, कसाल मार्गे सातारा (पाटण, पवनगाव), कराड, सांगली, कोल्हापुर (आजरा, शाहुवाडी, कोवाड) इत्यादी ठिकाणी बसेस रवाना होणार आहे त्यासाठी



मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली उपशहर प्रमुख शैलेश पाटील, मा. नगरसेवक दीपक जाधव, अमर पाटील, गणेश मुंडे, उमेश भगत, निलेश पाटील, चरणदास म्हात्रे, आदेश भगत आदि पदाधिकारी यांच्या जवळच्या शाखेमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

## अवयवदानासंबंधी गैरसमज दूर करण्यासाठी जीवनविद्या मिशन मैदानात वाशी रेल्वे स्टेशनच्या प्रांगणात भव्य मानवी साखळीचे आयोजन

**मुंबई प्रतिनिधी**

: भारतात दरवर्षी ३ ऑगस्ट या दिवशी अवयवदान दिन, तर १३ ऑगस्ट या दिवशी जागतिक अवयवदान दिन साजरा करण्यात येतो. अवयवदानासंबंधी लोकांच्या मनात असलेले गैरसमज दूर करणे हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे. यासाठी राज्य सरकारच्या मदतीसाठी सद्गुरु श्री वामनराव पै यांचे जीवनविद्या मिशन मैदानात उतरले आहे. अवयवदान दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग व विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती (ZTCC )तसेच जीवनविद्या मिशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच नवी मुंबईतील वाशी रेल्वे स्टेशनच्या प्रांगणात भव्य मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अवयवदान अभियान संदर्भात नागरिकांना माहिती देण्यात आली. तसेच इच्छुक अवयवदात्यांची नोंदणी करून घेण्यात आली.

माजी खासदार संजीव नाईक, कल्पना नाईक आणि संकल्प नाईक या कार्यक्रमास उपस्थित होते. जीवनविद्या मिशनचे विश्वस्त सचिव दीपक काळे, अवयवदान अभियान समिती प्रमुख प्रमोद रासम, विश्वस्त मुल्यमवार, प्रभाकर उंडे हेही यावेळी उपस्थित होते. जीवनविद्या मिशन नवी मुंबई १, नवी मुंबई २ व नेरुळ या तीन ज्ञानसाधना केंद्रांचे पदाधिकारी, पनवेल ते ऐरोली या विभागातील सक्रिय कार्यकर्ते, महिला, युवा व पुरुष मिळून ४०० पेक्षा अधिक लोकांनी एकत्रित येऊन या मानवी साखळीत सहभाग घेतला होता. युवा कार्यकर्त्यांनी जनजागृतीसाठी “अवयव दान श्रेष्ठ दान” या विषयावर आधारित पथनाट्य सादर केले. अनिता मोरे यांनी लिहिलेल्या या पथनाट्याचे दिग्दर्शन कोमल लेकावळे यांनी केले होते.श्रीकांत घाग, डॉक्टर किर्ती हंपे, प्रसाद कदम, अभिजीत कोदे, विनायक करलकर, संदिप शिर्के यासह अनेक नामधारकांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आपले योगदान दिले.

स्वाती संदाशी आणि सुचिता कलगुटकर यांच्या नियोजनाने मंत्रालयात देखील अवयवदान अभियान स्टॉल लावून नोंदणी करण्यात आली. अवयवदानाच्या माध्यमातून मृत्युपश्चात आपले मौल्यवान अवयवदान करण्याचा संकल्प करुन जीवनरक्षक आणि जीवन बदलणारा होण्याची संधी सर्वांना आहे.

---00---




## पायपीटची मुक्ता कोल्हापूरच्या शॉर्ट फिल्म फेस्टीवलमध्ये ठरली सर्वोत्कृष्ट कथा.

बीडच्या भुमिपुत्रांनी बीडच्या मातीत तयार केलेल्या मुक्ता या लघुपटाने पहिल्याच प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट पारितोषिकांची मुहूर्तमेढ रोवत बीडचे नाव रोशन करण्यास नव्याने सुरुवात केली आहे.

**उरण प्रतिनिधी**

दि-03-08-2024 रोजी पार पडलेल्या आय(I) शॉर्ट फिल्म फेस्टिवलमध्ये पायपीट फिल्म्स निर्मित व ॲड.सतिष धुताडमल दिग्दर्शित मुक्ता या लघुपटाला सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक दिले.तसेच सर्वोत्कृष्ट कथा म्हणून लेखक रंगनाथ आडागळे यांना प्रथम पारितोषीक देऊन गौरविण्यात आले. मागील वर्षीही पाखर या लघुपटाच्या कथेसाठी हा बहुमान त्यांना मिळाला होता. मुक्ता हा आजच्या शैक्षणिक धोरणाचं वास्तव मांडणारा लघुपट आहे.या लघुपटाच्या निर्मितीसाठी पायपीट फिल्मने गेली दोन वर्ष काम केले होते. मुक्ताच हे पहिलंच प्रदर्शन असून.प्रेक्षकांनी लेखक व दिग्दर्शक यांच्याकडे चित्रपटाविषय मत मांडत आपल्या भावना व्यक्त केल्या.त्या भावना व्यक्त करतांनी कोणाचे डोळे पाणावले तर कोणाच्या अंगावर शहारे आले. परीक्षकांनीही फिल्मचा विषय,आशय,मांडणी आणि कलाकार यांचे कौतुक करत पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. असे दिग्दर्शक धुताडमल यांनी सांगितले व ते पुढे चित्रपटा विषयी बोलताना म्हणाले की अजुन ही फिल्मचे तांत्रीक काम अपूर्ण असून ते लवकरच पूर्ण करून आम्ही विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये मुक्ताचा सहभाग नोंदवणार आहोत. या लघुपटातील कलाकार- किशोर उढान , सोनी जाधव, बाल कलाकर- गवळण काळे,अमृता दोरतले, दिपाली-रुपाली पवार, साधन बनगर , प्रितम पेजगुडे, किरण सोळुंके, अशोक तुरे, मसू मदने, चैतन्या कोपनर, चैतन्य पेजगुडे व प्रदीप दाभाडे इ.

छायाचित्रण-मुकेश ढवळे, सिंक साऊंड-महेश वाघमोडे तांत्रिक- मयुर ताटे मेकिंग- यश धुताडमल या सर्वांचे पायपीट फिल्म ने अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## माजलगाव मतदार संघातील रखडलेल्या रोजगार हमीच्या शेतक-याच्या विहिरीची रक्कम त्वरित द्या-दत्ता वाकसे मुख्यमंत्री कार्यालय पत्राद्वारे मागणी..

### केंद्र आणि राज्य सरकारकडून शेतकऱ्याची चेष्टा..!

गेल्या तीन महिन्यापासून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहिरी पंचायत समितीच्या माध्यमातून देण्यात आलेले आहेत परंतु गेल्या तीन महिन्यापासून शेतकऱ्यांनी स्वतःच्या पदर मोड करत व्याजाने कर्ज काढून पैसे उपलब्ध करून विहिरी खोदलेले आहेत परंतु राज्य व केंद्र सरकारकडून राज्यातील शेतकरी सुखावला पाहिजे या भावनेतून रोजगार हमी योजनेच्या विहिरी शेतकऱ्यांना अनुदानाच्या तत्त्वावर दिल्या जातात परंतु गेल्या तीन महिन्यापासून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील हजारो शेतकऱ्यांचे थकीत विहिरीचे मस्टरचे पैसे आणखीही दिलेले नाहीत त्यामुळे शेतकरी मेटाकोटीला आलेला आहे राज्य सरकारने केंद्र सरकार त्यांनी आत्महत्या केल्यानंतर जागे होणार काय असा सवाल दत्ता वाकसे यांनी केला आहे

**बीड:प्रतिनिधी**

बीड माजलगाव मतदार संघातील शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विहिरीची वाटप करण्यात आले यामध्ये शेतकऱ्यांनी विहिरी खोदल्या तीन मस्टरचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले व राहिलेले पाच ते सात मस्टर शेतकऱ्यांनी पाठवून दिले पण दोन महिन्याचा कालावधी लोटून सुद्धा पैसे जमा झाले नाही त्यामुळे शेतकऱ्यांच्या विहिरी अपुऱ्या राहिल्या अनेक तक्रारी करून सुद्धा पैसे मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या. त्यांनी



त्वरित विहिरीची रक्कम त्वरित शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावी असे पत्र मुख्यमंत्री कार्यालयाकडे शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी दिले. जवळील पदरमोड करून विहिरीला खर्च केला विहिरीचा हप्ता आज भेटेल उद्या भेटेल असे म्हणत तीन महिने लोटले पण पैसे आलेच नाही या शेतकरी लाभार्थ्या विषयी सरकारची संवेदना मेली का? सरकारच्या शहाणपणापायी धरतीच्या धनी ला दोन घास अन्न भेटत नाही कसलं हे सरकार काही दया माया नसावी का?असा प्रश्न शेतकऱ्यांच्या नजरेपुढे खेळत आहे कसलं हे शासन माजलगाव मतदार संघातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरीची थकीत पैसे त्वरित मिळावे करिता शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेच्या पत्राद्वारे शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रसिडेंट दत्ता वाकसे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com